# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७
दूरध्वनी क्र. ०२०-२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स ०२०-२५६९७५११




संदर्भ : विक्रीमं/३/५८१३ | दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२२

**प्रति,**
**मा. प्राचार्य / मा. संचालक,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न असलेली**
**सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था**

**विषय : संविधान सन्मान दौड (मिनी मॅरेथॉन) बाबत...**

महोदय / महोदया,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ नोव्हेंबर, २०२२ रोजी भारतीय संविधान दिनानिमित्त **'संविधान सन्मान दौड पुणे' (मिनी मॅरेथॉन)** हा कार्यक्रम संविधान स्तंभ मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे पहाटे ०५:३० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. सदरील (मिनी मॅरेथॉन) ही भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आयोजित केलेली आहे.

याद्वारे आपणांस विनंती की, वरील उपक्रमाबाबत आपण आपल्या महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक व सर्व घटकांना ज्ञात करावे व सदर उपक्रमात सहभाग घेण्यास प्रोत्साहीत करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्‍वासू,

**प्रा. (डॉ.) दिपक माने**
संचालक
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ